# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९ /१२/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०७ सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १५/११/२०१८ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १५/११/२०१८ रोजीचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | |
| ४. | श्री गणेश वसंत कामतेकर यांना लाड समिती शिफारस्सी नुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत. | निर्णय/ठरावः- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई आस्थापनेवरील कर्मचारी कै. श्रीमती वासंती वसंत कामतेकर सफाई कामगार हे दिनांक २७/०७/२०१३ रोजी निधन झाले असुन त्यांचा मुलगा श्री.गणेश वसंत कामतेकर (वय २६ वर्षे ) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (प्राची कोलासो) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई नालासोपारा आस्थापनेवरील कर्मचारी श्री.दुंदया मुकूंद पाटील, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | ठराव/ निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. दुंदया मुकूंद पाटील, सफाई कामगार प्रभाग समिती ई नालासोपारा (प.) यांना दि. ३१/०३/२०१८ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ नियम ६६ (१) अन्वये स्वेच्छा निवृत्ती करणेस मान्यता देण्यात येत आहे . श्री. दुंदया मुकूंद पाटील, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती नंतर द्यावयाचा अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (किशोर ग.पाटील) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ६. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई, नालासोपारा आस्थापनेवरील कर्मचारी श्री.अमोल बा. जाधव , कनिष्ठ अभियंता यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत.** | **ठराव/निर्णय :-** श्री. अमोल बा. जाधव, कनिष्ठ अभियंता यांनी सेवा २०वर्षापेक्षा जास्त झाल्याने महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ चा नियम ६६ (१) अन्वये दिलेला स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज मा. महासभेपुढे सादर करण्यात आला. श्री. जाधव यांचे स्वेच्छा निवृत्ती अर्जावर मा. महासभेत सविस्तर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला. श्री. जाधव, कनिष्ठ अभियंता, विद्युत हे एकमेव विद्युत विभागात अधिकारी कार्यरत आहेत त्यांचेनंतर महानगरपालिकेच्या विद्युत विभागाचा कार्यभार सक्षमपणे हाताळणारा एकही कर्मचारी महानगरपालिकेत कार्यरत नाही. त्यामुळे श्री. जाधव यांचे सेवेची महानगरपालिकेला आवश्यकता असल्याने लोकहीतास्तव त्यांचा स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज आजची ही महासभा नामंजूर करत आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (उमेश नाईक)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७. | **मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेची Alignmentg मंजूर विकास आराखडयात समाविष्ट करणे तसेच सदर प्रकल्पाने बाधीत होणाऱ्या जमीन मालकांना TDR देणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम-१९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेसाठी आलेल्या उपरोक्त प्रस्तावावर स्थानिक शेतकरी/ भूमीपुत्र यांचा असलेला तीव्र विरोध व आंदोलनाची भाषा यावर सभागृहात सदस्यांनी उपस्थित केलेले मुद्दे, त्या अनुषंगाने झालेली साधक बाधक चर्चा व सभागृहाच्या एकंदर भावना व कल लक्षात घेता सदरचा प्रशासनाकडील मंजूरीसाठी आलेला प्रस्ताव खालील नमूद कारणांसाठी आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते नामंजूर करीत आहे.<br>१. या प्रकल्पाच्या रेखांकनामध्ये येणारे क्षेत्र हे शेती व बागायती क्षेत्र असून येथील स्थानिक नागरिकांच्या उदरनिर्वाहाचे एकमेव साधन असल्याने त्यांच्या चरितार्थ व उदरनिर्वाह बंद होऊन शेतक-यांवर उपासमारीची वेळ येणार आहे हा स्थानिक लोकांवर अन्याय असून त्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होईल व शेतकरी भूमीहीन होतील.<br>२. सदर प्रकल्पाची कोणत्याही प्रकारची विस्तृत अथवा सविस्तर माहिती प्रशासनाकडील गोषवाऱ्यात नाही.<br>३. सदरहू प्रकल्प या महानगरपालिकेचा नाही त्यामुळे TDR मंजूर करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.<br>४. सदरचे क्षेत्र हे आदिवासी बहूल क्षेत्र असून या प्रकल्पात गरिब आदिवासी लोकांच्या जमिनी जाणार असल्याने ते भूमीहीन होणार आहेत.<br>५. यापूर्वीच्या मुंबई-बडोदरा एक्सप्रेस वे साठी येथिल स्थानिकांच्या जमिनीवर आरक्षण टाकण्यात आलेले आहे व आजमितीपर्यंत सदर प्रकल्प प्रलंबितच आहे. सदर प्रकल्पात शासनाकडून बदल झाल्याचे समजते परंतु यापूर्वीच्या सातबाऱ्याच्या इतर हक्कातील नोंदी आजतागायत तशाच आहेत तसेच प्रकल्प बाधितांना आजही त्याचा कोणत्याही प्रकारचा मोबदला मिळालेला नाही अथवा जमिन आरक्षणातून मुक्त देखील केलेली नाही.<br>६. मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे प्रकल्पासाठी होऊ घातलेल्या भूसंपादनाच्या विरोधात स्थानिक पातळीवर प्रचंड असंतोष असून बहूतांश ठिकाणी भूसंपादनाच्या विरोधात मोर्चे व आंदोलने देखील सुरु आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | | ७. सदर मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वेचा येथील नागरिकांना अथवा नव्याने वास्तव्यास येणाऱ्या नागरीकांना कोणत्याही प्रकारचा फायदा संभवत नाही. या हायस्पीड रेल्वेचे तिकिट दर विमान प्रवासापेक्षा अधिकचे असणार आहेत. सबब, सर्वसामान्य नागरिकांच्या ते आवाक्या बाहेर असतील.<br>८. सदर प्रकल्पासाठी आरक्षणाच्या दोन्ही बाजूस बफर झोन दर्शविण्यात येतो व त्यामुळे सदरची जमिन कोणत्याही प्रकारच्या वापरात येत नाही अथवा याबाबत शासन कोणताही मोबदला देत नाही.<br>९. प्रस्तुत मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेचा प्रकल्प कार्यान्वित करणेपेक्षा सध्या अस्तित्वात असलेल्या लोकल सेवेसह पश्चिम रेल्वेची गुणवत्ता व दर्जा सुधारणेबाबत आवश्यक त्या तातडीने उपाययोजना करण्यासाठी प्राधान्य देण्यात यावे तसेच उपनगरीय लोकल सेवेच्या फेऱ्यांमध्ये अधिकाधिक वाढ करावी जेणेकरुन येथिल प्रवाशांचा रेल्वे प्रवास सुकर सुरळीत व आरामदायी होणे आवश्यक आहे.<br>१०. वसई विरार शहर महानगरपालिकेचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम-१९६६ चे कलम ३७ (१) नुसार शासनाच्या मान्यतेसाठी यापूर्वी सादर केलेले बहुतांशी प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहेत.<br>वर नमूद कारणांसाठी व सभागृहात व्यक्त केलेल्या भावनांचा विचार करता मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वेची Alignment मंजूर विकास आराखडयात समाविष्ट करणे तसेच सदर प्रकल्पाने बाधीत होणा-या जमीन मालकांना TDR देणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणे बाबतचा प्रशासनाचा प्रस्ताव वसई विरार शहर महानगरपालिकेची ही सर्वसाधारण सभा (नियोजन प्राधिकरण) नामंजूर करीत आहे.<br>**अनुमोदक :- (मिलींद घरत) सुचक :- (उमेश नाईक)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | **<u>सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रिकास्ट आर.सी.सी. झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत.</u>** | <u>प्रस्तावाचा निर्णय</u> :-सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील गटारावर विविध व्यासाची आर.सी.सी. प्रिकास्ट झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या एकत्रित खर्च रु. १५ कोटी (वार्षिक ५०० लक्ष) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (उमेश नाईक)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | **<u>सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती</u>** | <u>प्रस्तावाचा निर्णय</u> :- सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I कार्यक्षेत्रामध्ये पाईप गटाराचे बांधकाम करणे कामी RCC विविध व्यासाचे पाईप पूरवठा करणे कामी होणाऱ्या एकत्रित खर्च रु. २४ कोटी (वार्षिक ८ कोटी) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय |

| | | |
|---|---|---|
| | **A,B,C,D,E,F,G,H,I कार्यक्षेत्रामध्ये पाईप गटाराचे बांधकाम करणे कामी RCC विविध व्यासाचे पाईप पुरवठा करणेसाठी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत.** | मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (महेश पाटील) सुचक :- (उमेश नाईक)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १०. | **सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील कार्यक्षेत्रात रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी करणे वगैरे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील कार्यक्षेत्रात रस्त्यावरील खड्डे बुजविणे, डागडुजी करणे वगैरे कामी होणाऱ्या एकत्रित खर्च रु. ५० कोटी (रु. १६.६७ कोटी वार्षिक) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (उमेश नाईक)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | **सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध उद्यानात विविध प्रकारची खेळणी व फिटनेस साहित्य बसविणे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध उद्यानात विविध प्रकारची खेळणी व फिटनेस साहित्य बसविणे कामी होणाऱ्या एकत्रित खर्च रु. २० कोटी (वार्षिक ६.६७ कोटी) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (उमेश नाईक)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १२. | सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती वैगरे करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील फुटपाथ, डिव्हायडर्स व कर्ब स्टोन दुरुस्ती करणे कामी कामी होणाऱ्या एकत्रित खर्च रू. १५०० लक्ष (वार्षिक ५०० लक्ष) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br><br>अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १३. | सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील गटारावर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यावर विविध व्यासाची फायबर झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊनपुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील गटारावर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यावर विविध व्यासाची फायबर झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या एकत्रित खर्च रू. २५ कोटी (वार्षिक ८.३३ कोटी) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- (कन्हैय्या भोईर) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १४. | सन २०१९-२० हया वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मध्ये पावसाळ्यापूर्वी नालेखोदाई करणेसाठीच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-२ निविदा दर मागिवणे कामी मान्यता देणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- सन २०१९-२० ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई - विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मध्ये पावसाळ्यापूर्वी नालेखोदाई करणे कामी होणाऱ्या रू. ७०० लक्ष खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे सन २०१९-२० या वर्षाकरीता बी-२ निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br><br>अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

| | | |
|---|---|---|
| १५ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दितील प्रभाग समिती बी कार्यक्षेत्रातील नालासोपारा (पूर्व) येथील रेल्वे प्लॅटफॉर्म क्र.४ ते प्रगती नगर येथे रेल्वे समांतर (पूर्वकडे) आर.सी.सी. नाळा बांधणे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सवीस्तर चर्चा झाली. तथापि, सदर नाला हा देशमुख फार्म ते अलकापूरी रस्त्यालगत पुढे शेवटपर्यंत शक्यतो जेथे लोकवस्ती आहे त्या परिसरापर्यंत करण्यात यावा. तसेच सेन्ट्रल पार्कचा काही भाग जेथे रेल्वे आणि इमारती यांच्यात अंतर कमी आहे त्या ठिकाणी निविदा करत असताना मोठया पाईप गटाराची सुध्दा व्यवस्था ठेवावी म्हणजे थेट ओपन चॅनल बांधता येत नसेल अशा ठिकाणी पाईप गटार करुन पाणी काढता येऊ शकेल. तसेच काम करत असताना सोसायटींच्या कंपाउंड वॉल, भुमीगत टाक्या यांचे नुकसान झाल्यास त्याची पुर्नबांधणी महानगरपालिकेमार्फत करावी लागणार असल्याने तशी तरतुद देखील सदर कामामध्ये करावी.प्रस्तावित करण्यात आलेल्या अंदाजपत्रकामध्ये वरील बाबींचा समावेश करुन होणाऱ्या सुधारीत अंदाजपत्रकीय खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत असून ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यात यावेत. याकामी येणाऱ्या कामाच्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १६. | सन २०१८-१९ या वर्षाकरीता माहे डिसेंबर २०१८ ते मार्च २०१९ (४ महिने) पर्यंत मुदतवाढ देऊन पुढील सन २०१९-२०, सन २०२०-२१, व सन २०२१-२२ हया तीन वार्षिक वित्तीय वर्षाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा,देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील तीन वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे (बी-२) निविदा दर मागविणे कामी मान्यता देणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- सन २०१८-१९ या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता माहे डिसेंबर २०१८ ते मार्च २०१९ या (४ महिने) पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे तसेच सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ह्या वित्तीय वार्षीक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्मशानभूमींची दैनंदिन सुरक्षा, देखभाल व इतर सर्व कामे करणे कामी होणाऱ्या एकत्रित रक्कम रू. ११०० लक्ष (वार्षिक ३६६ लक्ष) खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीव्दारे पुढील तीन वर्षाकरीता निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- (समीर डबरे) सुचक :- (उमेश नाईक)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| १७. | वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना मागणीनुसार नळ जोडण्या देण्याबाबत. | ठराव :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यांत आले की, मा.सर्वसाधारण सभा क्र. ९ दि. ०७/०६/२०११ च्या ठरावातील अ.क्र.२ मधील नमूद सामाईक गॅलरी असलेल्या आर.सी.सी. व लोड बेरींग इमारती इत्यादी अनधिकृत मालमत्तांसह सर्व प्रकारच्या मालमत्तांना अनुज्ञेय असणारा प्रचलित आकार, नळ जोडणी शुल्क ,रस्ता खोदाई फी तसेच आवश्यक अटी-शर्तीचे हमीपत्र घेवून व मा. उच्च न्यायालयाने अनधिकृत मालमत्तांमध्ये रहिवास करणाऱ्या नागरीकांना फक्त घरगुती वापरासाठी पाणी प्रचलित दरापेक्षा जास्त दर आकारुन देण्यात यावे या दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत |

| | | |
|---|---|---|
| | | मालमत्तांना जादा दराने पाणीपट्टी आकारण्यासाठी मा. स्थायी समितीमार्फत पाणीपट्टीचे दर निश्चित करुन नळ जोडण्या मंजूर करण्यास हि सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे.६९ गावांच्या पाणीपुरवठा योजनेतील गावांपैकी महानगरपालिकेत समाविष्ट गावांना तसेच गावांना तसेच गावांच्या वाढीव विकसीत भागात पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असल्याने या भागात पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने नव्याने जलवाहिन्या अंथरण्यासाठी आवश्यकतेनुसार जलवाहिन्या खरेदीस व त्यासाठी येणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br><br>**अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (उमेश नाईक)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

नगरसचिव

**वसई विरार शहर महानगरपालिका**